## पुष्प पहिलें

अध्यक्ष — र. पु. परांजपे

वक्ते — धनजयराव गाडगीळ

८ मे १९४९

संयुक्त महाराष्ट्राचें भवितव्य या विषयावर बोलण्याचा माझा अधिकार नाहीं. राजकारणांतल्या कर्तृत्ववान पुढाऱ्याचा तो विषय आहे. माझ्यासारख्या पुस्तकी अभ्यासकानें काय घडलें व त्यापासून काय बोध घेतां येईल एवढाच विषय घ्यावा हें इष्ट. यामुळेंच 'दार समितीपासून पट्टाभि समितीपर्यंत' असा संकुचित विषय मी घेतला आहे अर्थात् संयुक्त महाराष्ट्रावरील या उपव्याख्यान मालेस ही सुरवात असल्यामुळें राजकारणी मुत्सद्यांच्या भाषणाची पार्श्वभूमी या नात्यानें तुम्ही या भाषणाकडे पहा.

### आमची मागणी

नव्या लोकशाही हिंदुस्थानच्या घटनेंत संयुक्त महाराष्ट्र हा एक घटक असावा ही आपली एकमताची मागणी आहे. या प्रश्नावरील सरकारी मतें दोन अहवालावरून (पट्टाभि व दार समित्यांचे अहवाल) साधारणतः स्पष्टपणें सांगतां येतात. या दोन्हीं अहवालांत घालण्यांत आलेले सिद्धांत, व त्याबद्दल मला काय वाटतें हें मी आपणांला सांगणार आहे.

### मोठ्या शासनसंस्थेचे घटक

प्रथम आपण किरकोळ मुद्यांचा विचार करूं. भाषावार प्रांतरचनेची मागणी, विशेषतः संयुक्त महाराष्ट्र हवा असें म्हणणें हा प्रांतीयवाद आहे असा आरोप करण्यांत आला आहे. माझ्या मतें हा प्रश्न राष्ट्रीयवाद

वगैरेंचा नसून लोकशाही राज्यकारभाराचा आहे. मोठ्या शासनाविस्तारांत श्रेणी ह्या असतातच. राज्यकारभाराच्या घटनेंत स्थानिक, प्रांतिक, घटक अशी नांवें या संस्थांना असतात.

## हा प्रांतीयवाद नाहीं

या संस्था अमुक तऱ्हेनें न घडवितां दुसऱ्या विशिष्ट तऱ्हेनें घडवा असें म्हणण्यांत प्रांतियता नाहीं. जे या मागणीस प्रांतीयवाद समजतात, त्यांना हा विषयच कळलेला नाहीं असें मला वाटतें. घटनेंत प्रांताला जेवढे अधिकार असतात त्याहून महाराष्ट्रासाठीं आम्ही जास्त मागितले असते तर ती प्रांतीयता झाली असती. आम्ही याबाबतींत कांहींच न बोलतां मुकाट्यानें घटना मानावयास तयार आहोंत. याला प्रांतीयता म्हणणें चूक आहे.

## प्रांतीय कोण नाहीं ?

बडोद्याच्या विलीनीकरणामुळें मुंबईचा विस्तार वाढला असें आपले गृहमंत्री व पंतप्रधान अभिमानानें सांगतात. मग नवा महाराष्ट्र तीन कोटी जनतेचा होईल असें अभिमानानें सांगण्यांत प्रांतीयता कोठें येते ! कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष आचार्य कृपलानी आज हिरीरीनें या प्रांतीयवादाविरुद्ध बोलतात, तेंच कृपलानी हिंदुस्थानची फाळणी झाल्यावर आपण सिंधी असल्यामुळें पासपोर्टाशिवाय तेथें जाण्याचा आपला हक्क असल्याचें म्हणाल्याचें मला स्मरतें. आपत्तींत आपण एका विशिष्ट समाजाचे आहोत असें स्फुरतेंच. तसेंच आमच्या महाराष्ट्रीयांच्या मनांत आलें तर त्यांत नवल कसलें ! या दृष्टीनें पाहतां प्रत्येकजण प्रांतीय आहे. याला प्रांतीयवाद म्हणणे हीच मुळांत चूक.

## अतिरेक होतां कामा नये

मात्र या गोष्टींचा अतिरेक होतां कामा नये इतकें सर्वांनीं जपलें पाहिजे. हा अभिमान किती पत जाऊं द्यावयाचा यालाहि एक मर्यादा आहे. अशीच एक मर्यादा राष्ट्रीयवादालाहि आहे. प्रांतीयता विरूद्ध राष्ट्रीयवाद असा झगडा ―――नें फाजील स्तोम आहे. यामुळें हल्लींच्या राष्ट्रीय

वादाचा अतिरेक होण्याचा संभव आहे. आपल्या पायरींत प्रत्येक गटास अभिमान असेल तर त्याचा राष्ट्रोन्नतीस उपयोग करून घेतां येतो असें राजकारणपटू सांगतात. विशिष्ट समाजाची प्रगती व राजकारणांतले घटक यांचा संबंध आहे. कोल्हापूरच्या मराठ्यास नागपुरच्या मराठ्याबद्दल जेवढें वाटतें तेवढें धारवाडकराबद्दल वाटणार नाहीं. आमच्या समजाच्या प्रगतीचा असा हा वेगळा विचार आम्ही करू शकतो. मात्र राज्य घटनेच्या तंत्रानेंच तो केला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र ज्यांना मान्य नसेल त्यांनी महाराष्ट्राबद्दल कांहीं लिहूं नये.

## मागणी कशी मांडली ?

संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें व मुंबईस ज्या ज्या साक्षी झाल्या त्यांनीं एक मुखानें संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली आहे. आमची मागणी दुहेरी भूमिकेवर आधारलेली आहे, एक म्हणजे भाषावार प्रांतरचनेनें राज्यकारभारांत सौकर्य येतें ही, दुसरी म्हणजे नवे भारतीय संघराज्य स्वायत्त घटकांचें असल्यामुळें हे घटक नीट बनले पाहिजेत.

## आधार जुनेच

आमच्या मागणीसाठीं आम्हीं आधारहि अगदीं जुने घेतले. कै. पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालील व पं. जवाहरलाल यांच्या प्रेरणेनें तयार करण्यांत आलेल्या नेहरू कमिटीच्या अहवालांत भाषावार प्रांत कां हवेत याचें विवेचन करण्यांत आलें आहे. भारतीय घटना परिषदेचा पहिला ठरावहि—पूर्ण स्वायत्त घटकांचें हिंदी संघराज्य निर्माण करण्याची घोषणा करणारा—आम्हाला पोषकच आहे.

## दारसाहेब काय म्हणतात ?

भाषावार प्रांतरचनेसाठीं नेमण्यांत आलेल्या दार समितीचें अखेर म्हणणें काय हें समजणें जरा कठीणच आहे. एकभाषी गटांची इतर भाषी गटांवर हुकमत गाजण्याजोगें हें आहे असें दारसमितीचें मत आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते आणि ती म्हणजे महाराष्ट्राच्या न्याय्यमागणीबद्दल निष्कारण गैरसमज करून घेऊन खोटे आरोप त्यांनीं केले आहेत.

## लोकशाहीचा कांगावा !

आमची मागणी सदहेतूमेरीत नाहीं असें दार समिती म्हणते. लोकशाही नीट चालावी हा आमचा मुद्दा म्हणजे एक कांगावा आहे असा दार समितीचा आरोप आहे. पण भिन्न समाज एकत्र नांदूं शकत नाहींत या दृष्टीनें पाहतां आमची मागणी लोकशाहीस उपकारकच आहे.

## सध्याचे सचेतन घटक

सध्यांचे भाषावार प्रांत मोडूं नयेत. कारण ते ब्रिटिश साम्राज्यशाहीनें घडविलेले आहेत असें कमिटी म्हणते. या प्रांतांनीं मूळ धरलें असून ते सचेतन घटक आहेत. हे घटक भाषावार असल्यामुळें सचेतन आहेत असें आमचे म्हणणें आहे. म्हणूनच सगळे घटक भाषावार करा ही आमची मागणी आहे. आम्ही उपराष्ट्रांचें स्तोम माजवतों असाहि आरोप आमच्यावर करण्यांत येत आहे.

## समितीचा लोकशाही विरोध

राज्यकारभाराच्या सोयीसाठीं नवे प्रांत पाडावे असा आजचा सूर आहे. बरेच लोक याचा पुरस्कार करीत आहेत. सर्व हिंदुस्थानचे जिल्हे पाडून एकाच मध्यवर्ति सरकारकडे ते द्यावेत ही सूचनाही सोयीसाठीच आहे.

मात्र लोकशाहीचा आत्मा विकेंद्रीकरण हा असल्यामुळें हे विभाग लोकशाहीला अनुरूप हवेत. इष्ट तेवढें व शक्य तितकें विकेंद्रीकरण झालें पाहिजे. सध्यां ३० कोटींचे प्रतिनिधी निवडून राज्यकारभार हांकण्याची पद्धत ही खरी लोकशाही पद्धत नाहीं. घटकांच्या राज्यांत जनतेनें भाग घेतला पाहिजे. नाहींतर राज्यकारभार चालवतां येणार नाहीं. दार समितीचा खरा विरोध लोकशाहीला आहे. आपलेपणा, एकजूट निर्माण होईल हीच धास्ती त्यांनीं घेतली आहे !

मद्रास प्रांतासारखी स्थिति मध्य सरकारला सर्व प्रांतांत हवी काय ही शंका मात्र बळावत चालली आहे.

**पट्टाभी समिती**

पट्टाभि समितीच्या अहवालांत भाषावार प्रांतरचनेची मागणी ही पाकिस्तान सारखी नाहीं एवढेंतरी मान्य करण्यांत आलें आहे. मात्र नकार द्यावयाचा तो सांप्रतच्या परिस्थितीचा बागुलबोवा निर्माण करून, प्रांतियतेची शंका उपस्थित करून दिला आहे. भावना विसरूंद्या मग ही मागणी कशी मान्य करावयाची तें पाहूं असेंहि समिती म्हणतें. पुढारी जसजसे वयोवृद्ध होतात तसतसे ते मागचें विसरतात असें दिसतें. दहावर्षांपूर्वी या तिघांनीं ही मागणी अव्यवहार्य व अनुचित ठरविली नसती !

**परिस्थितिचा बागुलबोवा**

संस्थानांच्या विलीनीकरणामुळें नवीन नकाशा घडत आहे. अशा वेळीं भाषावार प्रांतरचनेनें गोंधळ होईल. असें म्हणण्यांत येतें. सर्वच पुनर्घटन ज्यावेळीं होत असते त्याचवेळीं आणखी कांहीं गोष्टींबाबत सहज पुनर्घटना घडवून आणतां येते. नकाशा विस्कटलेला असतांनाच भाषावार प्रांतरचना करणें इष्ट आहे. पुनः १० वर्षांनीं यासाठीं नकाशा विस्कटावा कीं काय ? भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व संस्थानीं खात्यानेंच मान्य केलें आहे.

**संस्थानी खात्याचा कारभार**

उडीया संस्थानें ओरिसांत विलीन केलीं, सर्व राजस्थानी भाषिकांचें नवें संघराज्य याच संस्थानी खात्यानें बनविलें डांग या लाखाच्या आंत वस्ती असलेल्या प्रदेशाचाहि अगदी न कळत जिल्हा बनविण्यांत आला ! सौराष्ट्र संघराज्याची जी सनद करण्यांत आली त्यांत तर या गोष्टीस अगदीं स्पष्ट मान्यता देण्यांत आली आहे. सर्व गुजराथी भाषिकांचा एक प्रांत होईल, त्यावेळीं त्या प्रांतांत सौराष्ट्रानें सामील व्हावयास या सनदेनें आडकाठी येऊं नये असें कलमच या सनदेंत आहे. दक्षिणी संस्थानांच्या विलीनीकरणाच्या वेळेस भाषावार तत्वावरच जिल्हे वगैरे बनवावे असे महाराष्ट्रीय व कर्नाटकी पुढारी यांत करार मदार झाले होते. तेव्हां संस्थानी खातें या गोष्टांचा पाया घालीत आहे.

## हा सारा कांगावा !

ही मागणी आज अनिष्ट, अपायकारक आहे असें म्हणणारे ही गोष्ट विसरतात. पण ही खरी भाषा नसून हा सारा कांगावा आहे, खरी अडचण त्यांनीं स्पष्ट शब्दांत मांडली असती तर तेवढेंच बरें झालें असतें. आम्हांला हें कळत नाहीं, असें हे लोक म्हणतात.

कोणाला देशहित किती कळतें याची चौकशी करण्याची पाळी मात्र यामुळें महाराष्ट्रावर येईल, नव्हे तशी पाळी आज आली आहे.

## खर्च वाढणार नाहीं

राज्यकारभाराचा खर्च वाढेल अशीहि एक सबब या मागणीविरुद्ध नेहमी पुढें करण्यांत येते. पण भाषावार प्रांतरचनेनें प्रांतांची संख्या १६ पेक्षां जास्त कधींच वाढणार नाहीं. आजचे कांहीं घटक तर याहून लहान आहेत. यामुळें राज्यकारभाराचा खर्च कमी होईल. भाषांवार प्रांतरचना ही आजचे आर्थिक प्रश्न-ज्यांची सबब नेहमीं पुढें करण्यांत येते-सोडविण्याचा एक मार्ग आहे. राज्यकारभाराचे घटक सुव्यवस्थित झाले तरच आर्थिक प्रश्न सुटण्याची शक्यता आहे. हेच घटक आपापल्या भागाची प्रगती करूं शकतील.

## सध्यांचे दुबळे प्रांत

सध्याच्या मुंबई, मद्रास, मध्यप्रांतसारखे प्रांत राहिल्यानें आर्थिक प्रश्न बिकटच होत राहणार. मंत्री कितीही कर्तृत्वान असला तरी दुसऱ्या भाषिकांना त्याचा विश्वास वाटत नाहीं. आजचा सार्वत्रिक गैरविश्वास एकंदरींत राज्यकारभार हांकण्याचे दृष्टीनें अयोग्यच. त्याच मार्गानें आर्थिक प्रश्न सुटतील हिही एक आत्मवंचना आहे. महाराष्ट्राला मोठी धरणें हवींत, गुजराथला ट्यूबवेल्स हव्यात. शिवाय दोन्ही भाषिकांची प्रकृति भिन्न आहेच. या दोघांनाहि मानवेल असें एक धोरण अशक्य आहे.

## परिस्थितीचा बागुलबोवा

सध्यांची परिस्थिति अशांत असल्याचाही असाच बागुलबोवा करण्यांत आला आहे. दोन्ही समित्यांनीं मुंबईबाबत जें लिहिलें त्यामुळें आमचा हा

संशय बळावला आहे. कोंकणांतील कांहीं भागांचें संपूर्ण मराठीकरण झालें नाहीं असें दार समिती म्हणते. कोंकणाचें मराठीकरण ही काय अजब चीज आहे मला समजत नाहीं. आणि ही भाषा नुसती अज्ञानमूलक नाहीं; हें विधान करतांना दार समितिनें त्यांच्या पुढें आधीं सादर केलेला पुरावा बुध्या डावलला आहे. यामुळें हा अहवाल वाटतो तितका साधा नाहीं.

## मुंबईबाबत

मुंबई बेट आहे असें दार—समिती म्हणते. बेटाचा व देशाचा संबंध नसतो हें मला माहित नव्हतें. मुंबईस मूळांत कांहीं थोडे कोळीच होते असें-ही लिहितात; पण मुंबई बेट निर्जन असतें तर ती महाराष्ट्राची भूमी नाहीं असें कोण म्हणू शकलें असतें काय ? यानंतर मुंबईची वाढ कशी झाली हा प्रश्न उपस्थित करण्यांत आला आहे. कलकत्त्याची वाढ स्कॉच व मारवाड्यांनीं केली म्हणून कलकत्ता स्वतंत्र करावयाची कोणाची हिंमत आहे ? जमशेदपूरची वाढ टाटांनीं केली असून तें सर्वांत जास्त बहुभाषी शहर आहे. म्हणून बिहारचा त्यावरील हक्क कोणी डावलला आहे काय ? अधुनिक महाराष्ट्राची वाढ थोडी इतर भाषिकांनीं केली असली तरी महाराष्ट्र नाहीं असें आपण म्हणत नाहीं मग मुंबईबाबतच हा शोध कां ?

## पट्टाभींचा निर्णय

अल्पसंख्याकांना हक्क,व्यापार,वगैरे बाबींतील धोरण केंद्रीय सरकारनें ठरवा-वयाचें आहे. तें सरकार म्हणेल तें आम्हीं मान्य करूं. पण भौगोलिक परिस्थिति कोणी बदलूंच शकत नाहीं. पट्टाभि समितीनें दार समितीच्या पुढें जाऊन निर्णय दिला आहे. मुंबईत धंदेवाल्यास,व्यापार उदीम करणाऱ्यास भीति वाटते म्हणून हा निर्णय देत असल्याचें समिती म्हणते. संयुक्त महाराष्ट्र झाला तरी मुंबई वेगळी राहाणार असा हा निर्णय आहे यांत तर्कशुद्धता नाहीं. सीमा प्रदेशाबद्दलहि असाच चुकीचा निर्णय आहे. यावरून त्यांना या विषयांतलें कांहीं कळत नसावें असें वाटतें.

### राजकारणांतला प्रवाह

या मागचें राजकारण पाहूं जातां दुर्दैवानें महाराष्ट्राची मागणी डाव्या उजव्यांच्या कलाहांत सांपडली आहे. ज्या लोकांचा राजकीय लोकशाहीवर विश्वास आहे त्यांना आर्थिक स्वायत्तता प्रिय आहे. उलट दुसऱ्या एका गटाला परिस्थितीच्या नांवाखालीं केंद्रीय सरकारला बलवान् करावयाचें आहे. आज मुंबईतल्या धंद्यांना धोका आहे असें पट्टाभि समिती म्हणते. व्यापार उद्योग घटत असल्याचे आंकडे त्यांनीं कोठून मिळविले ? महाराष्ट्रीयांपासून जर भीति वाटत असेल तर मुंबई वेगळी करून ही गोष्ट टळणार नाहीं. कारण मुंबईतले मजूर महाराष्ट्रीयच आहेत.

### खरें काय आहे ?

नवीन महाराष्ट्राच्या सरकारचें आर्थिक धोरण निराळें असण्याची शक्यता आहे हीच त्यांच्या पोटांतली खरी भीती आहे. मुंबईखेरीज महाराष्ट्र केला तर महाराष्ट्राची आर्थिक थैली आपल्या हतांत राहील ही त्यामागील मुत्सद्देगिरी आहे. मग महाराष्ट्र आपल्या कावूंत राहील ही त्यांची भावना असावी ! 'एका खोलींत सहा सहा जण राहणारे व आम्हीं धंदेवाले यांना एकाच मापानें मोजणार काय ? ' असा सवाल मुंबई समितीच्या साक्षींत एका धंदेवाल्यानें विचारला होता. आर्थिक वाढ खुंटत आहे या एकाच सबबीवर धंदेवाल्यांनी आपलें घोडें पुढें दामटावें व तीन पुढाऱ्यांनी तें ऐकून अहवालांत नमूद करावें हें आश्चर्य आहे. वास्तविक मुंबईला आज प्रत्यहि नवे कारखाने निघत आहेत. अगदीं अवास्तव निघत आहेत. त्यांचीच वाढ मुंबईच्या हितासाठीं थांबविली पाहिजे.

### विसंगति

दार समितीनें आपल्या अहवालांत पुणेरी वृत्तीबद्दल लिहिलें आहे. तें मला उद्देशून लिहिलें कीं शंकरराव देवांना उद्देशून ? आम्ही असें काय म्हटलें आहे कीं, जें इतरांशीं विसंगत आहे ? अज्ञान, पूर्वग्रह, राजकीय व आर्थिक बाबींचें उजवें धोरण ही विसंगती परिस्थितीमुळें निर्माण झाली आहे.

स्वराज्य मिळण्यापूर्वी जाहीर केलेले डावे सिद्धांत उजवीकडे मिळवून घेण्याच्या प्रयत्नांमुळे ही विसंगती निर्माण झाली आहे. आपण महाराष्ट्रीय या परिस्थितीत सांपडलों आहोंत.

## महाराष्ट्र मागें नाहीं

आपली राजकीय परंपरा विकेंद्रीकरणाच्या बाजूची आहे. यामुळें आपण महाराष्ट्रीय डाव्या बाजूस पडतो. मुंबईमुळें ही गोष्ट विशेष प्रामुख्यानें नजरेस आली. महाराष्ट्राची पिछेहाट झाली असें मानणारा मी नाहीं. महाराष्ट्रानें आपली बुद्धि गहाण टाकली नाही. स्वार्थलोलुपता दाखविली नाहीं, अगर नीतिमत्ता गमावली नाहीं. आपली पिछेहाट झाली नाहीं याची हीं तीन गमकें आहेत. इतिहासकाळीं ब्राम्हण क्षत्रियांनी वैश्यांची केलेली उपेक्षा यामुळें आपण एका बाबतींत थोडे मागें आहोंत.

## डाव्यांचा पाठिंबा

आज परिस्थिति थोडीशी उलटलेली दिसली तरी महाराष्ट्रीयांनीं घाबरून जाण्याचें कारण नाहीं. मुंबई वेगळी होणें शक्य नाहीं. सर्व डावे आमच्या मागें आहेत. त्यांत अनेक महाराष्ट्रीयेतरहि आहेत. यामुळें आपण एकाकी पडलो नाहीं. आज या डाव्यांचा आवाज मोठा आहे. सगळ्या जगाकडे पाहतांना भवितव्य डाव्यांच्या हातांत आहे असें मला वाटतें. उद्यां ही परिस्थिति बदलेल. यामुळें आपणांस निराश व्हावयाचें बिलकूल कारण नाहीं.